**MHNS160005762025**

<u>निशाणी क्र. १ खालील आदेश</u>

**दिनांक १०/०३/२०२६**

१. अर्जदारांनी त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. मयत दिनकर पंढरीनाथ केदारे यांचे दिनांक ०१/०७/२००४ रोजी गावी निधन झाले. मयताचे अर्जदार क्र.१ ही मयत गणेश दिनकर केदारे यांची पत्नी व अर्जदार क्र. २ ही मुलगी आहे. अर्जदार क्र. १ ते ५ त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कुणीही वारसदार नसल्याचे कथन केले आहे.

३. अर्जदारांनी अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र. १ ने त्यांच्या पुराव्याचे शपथपत्र **<u>निशाणी क्र. ११</u>** अन्वये दाखल केले आहे. मयताचे गट क्र. ९३१ मध्ये ०.४० आर रु. ००.४४ पैसे व गट क्र. ९३३ मध्ये १ हे.९५ आर, ०१.१३ पैसे अशी मालकीहक्काची असुन ते गावी दि.०१.०७.२००४ रोजी मयत झाल्याने त्यांची वारस फेरफार नोंद होण्याकामी त्यांची मयत पत्नी मिना दिनकर केदारे यांनी दि.१७.०३.२०१३ रोजी वारस अर्ज दाखल केला त्यात अर्जदार क्र. १ ही गणेश दिनकर केदारे यांची पत्नी व अर्जदार क्र. २ मुलगी कायदेशीर वास असतांना त्यांची माहिती लपवून खोटी व चुकीची वारस नोंद क्र. १८२७ प्रमाणित केली. त्याविरुद्ध अर्जदार क्र. १ ने उपविभागीय अधिकारी चांदवड यांच्या न्यायालयात आर.टी.एस अपील क्र. १५/२०२० अर्ज दाखल केला त्यात दि.२९.०९.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी यांदी आदेश पारित करुन अर्जदार क्र. १ चा अर्ज मंजूर केला. त्यानुसार अर्ज मिळकत गट क्र. ९३१ व ९३३ वरील दाखल वारस फेरफार नोंद क्र. १८२७ ही रद्द केली व अर्जदार क्र. १ ने दिवाणी न्यायालयाचे वारस दाखला प्राप्त करुन घेऊन त्यानंतर तलाठी खडकओझर यांनी नव्याने वारस नोंद अधिकार अभिलेखात दाखल करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार अर्जदार मयताचे वारस असल्याचे अर्जदारांचे कथन आहे. त्यांचे शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुनरउल्लेख करुन अर्जदारांच्या नावे सदरील मालमत्ते बाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे.

अर्जदाराने मालमत्तेचे मुल्यांकन ३,७५,५००/– दर्शविले आहे मात्र त्याबाबत मुल्यांकनाचे प्रमाणपत्र दाखल केले नाही अर्जदाराने संबंधीत कार्यालयाकडून मुल्यांकनाचा दाखला घेउन मालमत्तेचे शासकीय मुल्यांकानावर मुद्रांक भरण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. व प्रार्थनेप्रमाणे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदारांनी दिनकर पंढरीनाथ केदारे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत **निशाणी क्रमांक २१/क**, मिना दिनकर केदारे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, **निशाणी क्रमांक २२/क,** गणेश दिनकर केदारे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत **निशाणी क्रमांक २३/क,** अर्जदारांचे ओळखपत्राची छायांकित प्रत **नि.क्र. १६/क ते २२/क** इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच पुरावा बंद केल्याची पुरसीस **नि.क्र. २४/क** वर सादर केली आहे.

५. अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'दैनिक आपलं महानगर' या दिनांक १४.०६.२०२५ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द **नि. क्र. ९** करण्यात आले. मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

६. वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदारांनी शपथेवर त्यांचे व्यतिरिक्त मयताला इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. अर्जदारांनी सदरचा अर्ज मयताचे प्राथमिक वारस घोषित करुन मिळण्याकरिता दाखल केला असल्याने व अर्जदार क्र.१ ते ५ हे मयताचे वारस असल्याचे प्रथमदृष्ट्या दिसुन येते व अर्जदारांच्या मागणीला कोणीही आक्षेप नोंदविला नाही. त्यामुळे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही.

७. वरील सर्व बाबींचा एकंदरीत विचार करता कायद्याची वारस प्रमाणपत्रासंदर्भातील स्थायी स्थिती लक्षात घेता सदर प्रमाणपत्राद्वारे अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याचे याव्दारे प्रमाणीत करण्यात येते. परंतु सदर प्रमाणपत्रान्वये वारसांचे कोणतेही हक्क अथवा अधिकार याव्दारे अर्जदारांना देण्यात येत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत दिनकर पंढरीनाथ केदारे यांचे मृत्यू पश्चात वारस असल्याबाबत न्यायालयाकडुन मान्यता देण्यात येते. त्यांची नावे विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र, त्यांनी मालमत्तेच्या १/२ मुल्यांकन २,३४,०००/- व १,४१,५००/- असे एकूण ३,७५,५००/- रक्कमेवर आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.03.10 17:06:16 +0530

**( एस.एस.छल्लाणी )**

दिनांकः १०/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,चांदवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्र.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | १०/०३/२०२६ |